दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● रविवार ५ मे २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २६२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# पंकजाताईची गॅरंटी जिल्ह्याने बघितली ; विकासाची नवी उंची गाठण्यासाठी मत द्या

## खा. प्रितमताई मुंडे यांचे मतदारांना आवाहन, चनई जिल्हा परिषद गटात झंझावती प्रचार दौरा



**(अंबाजोगाई प्रतिनिधी)**

महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे या राज्याच्या ग्रामविकास मंत्री आणि जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना त्यांच्या विकासाची गॅरंटी आपण सर्वांनी बघितली आहे. त्यांच्या काळात सुरु झालेली विकासाची प्रक्रिया पुढे निरंतर सुरु ठेवण्यासाठी आणि विकासाच्या नवी उंची गाठण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना मत दया' असे आवाहन खा.डॉ. प्रितमताई मुंडे यांनी मतदारांना केले. भाजप आणि महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारानिमित्त खा.प्रितमताई मुंडे यांनी अंबाजोगाई तालुक्यातील चनई जिल्हा परिषद गटात झंझावती दौरा केला. चनई, उमराई, धावडी, केंद्रेवाडी, लाडेवडगाव येथील मतदारांशी त्यांनी संवाद साधला. आपल्या बीड जिल्ह्याच वैशिष्ट्य आहे, जिल्ह्यातील मतदार नेहमी विकासाला प्राधान्य देतात. हा आपल्या लोकांचा दृष्टिकोन आहे, लोकांचा हा दृष्टिकोन कायम राहावा ही आपली जवाबदारी असल्याचे खा.मुंडे म्हणाल्या. बीड लोकसभा मतदारसंघातून महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना लोकसभेत पाठवन ही आपली गरज आहे. पुढील पिढ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून आपलं एक मत बीड जिल्ह्याच्या विकासाला, सुबकतेला, सुसंस्कृतपणाला, सामाजिक सलोख्याला आणि बीड जिल्ह्याच्या सुजलाम सुफलामतेच्या धोरणाला म्हणून पंकजाताई मुंडे यांना द्या,निश्चित आपल्या विश्वासाला सार्थ ठरवून बीड जिल्ह्याच्या विकासाची नवी उंची आपण गाठू अस त्या म्हणाल्या. दरम्यान केजच्या आ. नमिता मुंदडा, बालासाहेब दौडतले, नारायणराव केंद्रे, शंकर उबाळे, हिंदुलाल काकडे कमलाकर कोपले, सतीश केंद्रे, दीपक शिंदे, सचिन शेप, सचिन फड, महेश शेप, राहुल राख यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते याप्रसंगी उपस्थित होते. विरोधकांचा अपप्रचार आणि बुद्धिभेद हाणून पाडा आपल्या उमेदवार सर्वसमावेशक आणि लोकांच्या अपेक्षांना पूर्ण करण्याची क्षमता ठेवणाऱ्या आहेत. जिल्ह्यात कुठेही आजूबाजूला नजर फिरवली तर राष्ट्रीय महामार्ग, ग्रामीण रस्ते झालेले दिसतील. जलयुक्त शिवार योजनेतून बीड जिल्ह्यात पाणी पातळी वाढवण्याच कार्य पंकजाताईंनी केले आहे. विरोधकांकडे आपल्या उमेदवाराविरुद्ध बोलण्यासाठी काहीही नसल्यामुळे सामान्य मतदारांमध्ये अपप्रचार करणे, बुद्धिभेद करणे' असे प्रकार विरोधकांकडून केले जात आहेत. जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना पंकजाताईंनी आपल्या जिल्ह्याचा मागासलेपणा खोडून काढण्यासाठी अभूतपूर्व विकास निधी आणला, विकास कामे करताना, निधी देताना त्यांनी कधीही भेदभाव आणि द्वेष केला नाही,त्यांचे राजकीय भवितव्य जसे उज्वल आहे, तसेच बीड जिल्ह्याचे भवितव्य उज्वल करण्यासाठी सर्वांनी पंकजाताईंच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा. आपल्या बीड जिल्ह्याचा मतदार सुज्ञ आहे, विकासाची कास ओळखून मतदार पंकजाताईंना ऐतिहासिक मताधिक्याने लोकसभेत पाठवून विरोधकांचा बुद्धीभेद आणि अपप्रचाराला हानून पाडेल असा असे खा. प्रितमताई म्हणाल्या

## कोठाळा येथे एरंडा गंजीला आग शेतक-यांचे लाखोंचे नुकसान

वादळवार्ता/नायगांव




नायगांव तालुक्यातील कोठाळा येथील शेतकरी मारोतराव किशनराव कोठाळकर यांच्या एरंडा गंजीला आग लागून शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले आहे आज दिनांक ३ मे रोजी दुपारी दोन च्या सुमारास अचानक लागलेल्या आगीत अंदाजे १५ वीस क्विंटल दोन लाख रूपयांचे एरंडा जळून खाक झाले आहे त्यामुळे कर्जबाजारी असलेल्या मारोतराव किशनराव कोठाळकर यांच्यावर मोठे संकट कोसळले आहे त्यांनी शासनाने झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून आर्थिक मदत करवी अशी मागणी केली आहे

## ज्येष्ठांनी आर्थिक फसवणुक होवू नये याची दक्षता घ्यावी – लक्ष्मी खंडेलवाल.

**वादळवार्ता/कुडूत्री**

जीवनभरची पुंजी ही ज्येष्ठांच्या उतारवयातील आधार असते.ती सुरक्षित ठिकाणी गुंतवल्यास उर्वरीत आयुष्य हे निवांत व निर्धास्तपणे जगता येते.व त्या मुळे ज्येष्ठांचे आयुर्मान वाढत असल्याचे प्रतिपादन युनिटी स्मॉल फायनान्स बँकेच्या शाखाधिकारी मा.लक्ष्मी खंडेलवाल यांनी केले . कोल्हापूर येथील शाखा राजारापुरी युनिटी स्मॉल फायनान्स बँक आयोजित "ज्येष्ठांचा पैसा सुरक्षीत व लाभकारी गुंतवणूक कशी करता येईल" या संदर्भात मार्गदर्शन बैठकीत त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी फेस्कॉम कोल्हापूर प्रादेशिक विभाग चे अध्यक्ष दिलीप पेटकर होते.

उतार वयात ज्येष्ठांची आर्थिक व्यवहार संदर्भात अनेक ठिकाणी फसवणूक होत असल्याचे आपण वर्तमानपत्रात वाचतो तेव्हा ज्येष्ठांनी विचार करून योग्य ठिकाणी सुरक्षित ठिकाणी गुंतवणूक केल्यास परताव्याबरोबरच त्यांना सर्व सुविधा उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले.युनिटी बॅकेतील सर्व व्यवहार हे पारदर्शक असून ज्येष्ठांसाठी घरपोच सेवे बरोबरच व्याजाचा समाधान कारक परतावा देणारी असल्याने ज्येष्ठांनी आपली पुंजी लाभधारक स्किम मध्ये गुंतवून निश्चिंत रहावे असे त्यानीआवाहन केले.



या वेळी ज्येष्ठ नागरीक श्रीकांत आडीवरेकर,पत्रकार एन.एस. पाटील यांचा सत्कार लक्ष्मी खंडेलवाल यांचे हस्ते केला.

कार्यक्रमास विविध क्षेत्रातील निवृत्त ज्येष्ठ नागरीक उपस्थित होते.ज्येष्ठांना बँके मार्फत भेटवस्तु देण्यात आल्या.

## पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ राजकिशोर मोदी यांनी संपूर्ण शहर काढले पिंजून

वादळवार्ता/अंबाजोगाई

महायुतीच्या उमेदवार पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाई शहराच्या प्रत्येक प्रभागातील कोपरा न कोपरा पिंजून काढत आहेत. आपल्या अनेक सहकाऱ्यांना त्याचबरोबर मित्रपक्षांतील देखील सहकर्यांना सोबत घेऊन शहरभर प्रचार करतांना दिसत आहेत.शहरातील अबाल वृद्ध तथा युवा पिढीकडून त्यांना उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत आहे. या प्रचारफेरी दरम्यान राजकिशोर मोदी यांच्या सोबत माजी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा,बबन लोमटे, महादेव आदमाने, खालेद चाऊस,किशोर परदेशी, भाजपचे माजी नगरसेवक कमलाकर कोपले, अनंत लोमटे, शरद कोपले, राहुल कोपले,शैलेश कुलकर्णी, तसेच माजी नगरसेवक धम्मा सरवदे, दिनेश भराडीया , संतोष शिनगारे, रुपेश चव्हाण,सुनील वाघाळकर , संजय कोंबडे, आनंद कर्णावट, तानाजी देशमुख, पंडित हुलगुंडे, बाळासाहेब आदमाणे, आशिष ढेले, बाबासाहेब गुंजाळ, गोविंद गुंजाळ, राहुल मुंडे, सुधाकर कुचेकर, बाळू गुंजाळ, दत्ता लोंढे, सय्यद मन्सूर, खदीर सय्यद, अंकुश आवाडे, रमेश गायसमुद्रे, सिध्दार्थ वाघमारे, शाकेर काझी यांच्यासह अनेक कार्यकर्ते तथा सहकारी या प्रचारफेरीत सहभागी झाले होते. अंबाजोगाई शहरातील राजीव गांधी चौक पतीसरातून वडार गल्ली, रायगड नगर,टिळक नगर, नागसेन नगर, एकात्मता कॉलनी, माऊली नगर, महात्मा फुले नगर , या भागासह सिद्धार्थ नगर, हमाल गल्ली, हावळे गल्ली, गुरुवार पेठ, गांधी नगर, गवळी पुरा,मिलिंद नगर, भोई गल्ली, मोची गल्ली, शिंपी गल्ली, सदर बाजार परिसर पिंजून काढला.

अंबाजोगाई शहर व येथील नागरिकांना पंकजा गोपीनाथ मुंडे यांचे आगामी काळातील व्हिजन तथा कामाची रूपरेषा लोकांसमोर ठेवत आहेत . त्यांनी बीड जिल्हा व जिल्ह्यातील तमाम नागरिकांसाठी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी कमळ या निशाणीचे बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन देखील प्रचार रॅली दरम्यान राजकिशोर मोदी त्यांचे सहकारी यांच्या वतीने करण्यात येत आहेत.



संपादकीय

## (कार्ल मार्क्स जयंती विशेष.)

कार्ल मार्क्स यांच्या विचारांची लोकप्रियता सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर कमी झाली असली तरी ते विचार शिक्षण क्षेत्र, राजकीय क्षेत्र, कामगार लढा यामध्ये अजूनही लोकप्रिय आहेत. मार्क्स यांचे विचार अनेक कम्युनिस्ट राज्ये आणि राजकीय चळवळींमध्ये अजूनही आदर्श मानले जातात. ते वर्ग संघर्षाचे प्रणेते होते. सदर ज्ञानवर्धक संकलित लेख श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी वाचक सेवेत प्रस्तुत करताहेत... संपादक.

कार्ल मार्क्स हे १९ व्या शतकातील एक जर्मन अर्थशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ होते. त्यांनी अनेक विषयांवर लिखाण केले पण त्यांचे वर्गसंघर्षावरील लिखाण हे जास्त प्रसिद्ध आहे. फ्रेडरिक एन्जेल्सप्रमाणे मार्क्सने देखील तत्कालिन राजकीय लढ्यांमध्ये भाग घेतला. कार्ल मार्क्स यांनी दास कॅपिटाल या ग्रंथाचा पहिला खंड इ.स.१८६७मध्ये प्रसिद्ध केला. कार्ल मार्क्स यांच्या विचारांची लोकप्रियता सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर कमी झाली असली तरी ते विचार शिक्षण क्षेत्र, राजकीय क्षेत्र, कामगार लढा यामध्ये अजूनही लोकप्रिय आहेत. मार्क्स यांचे विचार अनेक कम्युनिस्ट राज्ये आणि राजकीय चळवळींमध्ये अजूनही आदर्श मानले जातात. ते वर्ग संघर्षाचे प्रणेते होते

डॉ.कार्ल मार्क्स यांचा जन्म दि.५ मे १८१८ रोजी जर्मनीतील ट्रायर या गावी झाला. त्यांचे वडील -हाईनलॅंड येथे वकिलीचा व्यवसाय करीत असत. बॉन विद्यापीठात विधी शाखेची पदवी मिळवल्यानंतर त्यांनी बर्लिन विद्यापीठात डॉक्टरेट पदवी मिळविण्यासाठी प्रवेश घेतला. इ.स.१८४१मध्ये त्यांचा प्रबंध मान्य होऊन त्यांच्या नावामागे डॉक्टर ही उपाधी लागली. डॉ.मार्क्स यांचा सामाजिक चळवळीवरील प्रभाव अतुलनीय आहे. ते स्वतः एक उत्कृष्ट अर्थशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ होते. जर्मनीतील जेना विद्यापीठामध्ये कायदा आणि तत्त्वज्ञानाचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी पत्रकार म्हणून काम सुरू केले. डॉ.कार्ल मार्क्स यांनी इ.स.१८४८ रोजी कम्युनिस्ट विचारसरणीचा पाया घातला. फ्रेडरिच एन्जेल्स यांच्या सहकार्याने लिहिलेल्या कम्युनिस्ट मॅनिफेस्टोत त्यांनी कामगार-मजूर वर्गाने क्रांती करून कम्युनिस्ट समाज स्थापन करावा असा विचार मांडला. मार्क्स यांनी स्वतः समाजवादाची स्थापना केली नसली तरी समाजवादावर त्यांच्या विचारांचा खूप मोठा प्रभाव आहे. त्यांच्या स्फोटक विचारांमुळे त्यांना पॅरिस, ब्रसेल्स आणि नंतर लंडन येथे हद्दपार करण्यात आले. फ्रेडरिक एन्जेल्स यांनी मार्क्स यांच्या टिपणांच्या आधारे दास कॅपिटालचे उर्वरीत दोन खंड लिहून प्रसिद्ध केले.

कार्ल मार्क्सच्या शास्त्रीय समाजवादात द्वंद्वात्मक भौतिकवाद, ऐतिहासिक भौतिकवाद, अतिरिक्त मूल्य सिद्धांत, वर्गसंघर्ष, राज्यविहीन व वर्गविहीन समाज या साऱ्या विचारांचा समावेश होतो. धर्म दुबळ्या माणसाला भ्रामक सुख, आभासात्मक सुख देतो. त्याची ती गरज आहे, भ्रम आहे. धर्माच्या रूपाने व्यक्त होणारे दुःख हे एकाच वेळी खऱ्या दुःखाचे प्रकटरूप असते आणि त्याच वेळी तो खऱ्या दुःखाचा निषेधही असतो. धर्म हा दबलेल्यांचा, दीनदुबळ्यांचा आवाज असतो. धर्म हृदयशुन्य जगाचे हृदय असते.

# दलित-पतित उद्धारक लोकराजा!

(छ.शाहू महाराज स्मृती दिन.)

राजर्षी शाहू महाराजांची विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भेट झाली. बाबासाहेबांच्या मूकनायक या वृत्तपत्रास व पुढे त्यांच्या इंग्लंडमधील उच्चशिक्षणास त्यांनी अर्थसाहाय्य केले. माणगाव व नागपूर येथील अस्पृश्यता निवारण परिषदांत त्यांच्याबरोबर सहभागी होऊन अस्पृश्यांना त्यांचा खरा पुढारी मिळाल्याबद्दल त्यांनी त्यांचा गौरव केला. अस्पृश्यतेबरोबरच जातिभेदाशी त्यांनी अखेरपर्यंत संघर्ष केला. आंतरजातीय विवाह हा जातिभेदावर रामबाण उपाय वाटून त्यांनी आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. स्वत: पुढाकार घेऊन अनेक आंतरजातीय विवाह घडवून आणले. तसेच बालविवाहास प्रतिबंध करून नोंदणी विवाहाचा कायदा जारी केला. घटस्फोटास व विधवापुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली. कुटुंबात होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळांपासून स्त्रीला संरक्षण देणारा कायदाही त्यांनी मंजूर केला. मागासलेल्या वर्गांतील मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षणाची सुविधा निर्माण केली. आपली राजकीय कारकीर्द समस्त समाजांना न्याय देण्यात खर्ची घातली होती, म्हणूनच त्यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून उत्साहाने साजरी केली जाते.

सामाजिक सुधारणांबरोबरच त्यांनी शेतीस व उद्योगधंद्यांस प्रोत्साहन दिले. अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरविली. पन्हाळ्यावर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडींचे प्रयोग केले. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यांसारख्या बाजारपेठा वसविल्या. त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिद्ध पावली. शाहूंनी कोल्हापुरात कारखानदारीचा पाया रचला. शाहू मिलची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास त्यांनी चालना दिली. शाहूंनी बांधलेले राधानगरीचे धरण कृषी क्षेत्रात संस्थानचा कायापालट करणारा उपक्रम ठरला. संस्थानी मुलखातील हे सर्वांत मोठे धरण बांधून त्यांनी आपले संस्थान सुजलाम्-सुफलाम् करून टाकले. त्यांनी सहकारी संस्थांचा कायदा करून सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.

छत्रपती शाहू महाराज कोल्हापूर महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर संस्थानचे प्रागतिक अधिपती आणि थोर समाजसुधारक होत. प्राथमिक शिक्षण, जातिभेद-निवारण, अस्पृश्यता-निवारण आदी सुधारणांचे पुरस्कर्ते होते. त्यांचा जन्म दि.२६ जून १८७४ रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव यशवंतराव होते. चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते दि.१७ मार्च १८८४ रोजी कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले. राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. सर फ्रेझर व रघुनाथराव सबनीस यांसारखे गुरू त्यांना मिळाले. विद्यार्थिदशेत त्यांनी इंग्रजी, संस्कृत, इतिहास, राज्यशास्त्र इ. विषयांचा अभ्यास केला. त्यांना दि.२ एप्रिल १८९४ रोजी राज्याधिकार प्राप्त झाला. तत्पूर्वी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येबरोबर सन १८९१ साली त्यांचा विवाह झाला. त्यांना राजाराम व शिवाजी हे दोन मुलगे आणि राधाबाई- आक्कासाहेब व आऊबाई या दोन कन्या झाल्या. त्यांनी प्रशासन- यंत्रणेनची पुनर्रचना करून बहुजन समाजातील कर्तबगार व गुणी व्यक्तींना अधिकारावर नेमण्यास सुरुवात केली. सन १८९७-९८ साली प्रथम दुष्काळ व नंतर प्लेग अशी संकटे कोसळली.

मागासलेल्या जातींत शिक्षणाबद्दल फारशी आस्था नसल्याने व त्याचे कारण शिक्षण घेऊनही सरकारी नोकरी लाभण्याची शक्यता नसल्याने त्यांनी दि.२६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानातील ५० टक्के शासकीय नोकऱ्या मागास वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे ते भारतातील पहिले राज्यकर्ते ठरले. अस्पृश्यतेचे उच्चाटन हे आपले जीवितकर्तव्य मानले. संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने, कचेऱ्या आदी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला. त्यासाठी अनेक वटहुकूम जारी केले. त्यांनी अस्पृश्यांना सरकारी नोकरीत घेतले. समाजातील तलाठ्यासारख्या प्रतिष्ठेच्या जागा दिल्या. त्यांच्यापैकी अनेकांना माहूत, हूलस्वार, पोलीस, स्वत:चे मोटारचालक म्हणून नेमले. भटक्या व विमुक्त जातींना जवळ करून त्यांचे जीवन स्थिर केले. त्यांना आपले रक्षक म्हणून नेमले. खेड्यापाड्यांतील बलुतेदारांनाही त्यांच्या बलुतेपद्धतीतून मुक्त करून त्यांना समाजातील सर्व उद्योगधंदे खुले केले. जोगिणी व देवदासी प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा जारी केला.

सन १९०२ साली सातव्या एडवर्डच्या राज्यारोहणानिमित्त त्यांनी युरोपचा दौरा केला. तेथील भौतिक प्रगतीचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला; त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व समृद्ध झाले. बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत, हे जाणून त्यांनी शिक्षणाच्या, विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सन १९१७मध्ये सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. ते शिक्षणसम्राट महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचारसरणीकडे आकृष्ट झाले. सत्यशोधक तत्त्वांना त्यांचा पाठिंबा होता. मराठ्यांसाठी सन १९२०मध्ये स्वतंत्र क्षात्र जगद्गुरू पद निर्माण करून त्यावर सदाशिवराव पाटील या उच्चविद्याविभूषित तरुणास नेमले. त्यांनी संगीत, नाट्य, चित्रकला, मल्लविद्या आदी कलांना राजाश्रय देऊन महाराष्ट्रात कलेच्या क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी केली. अनेक गायक-गायिकांनी त्यांच्या आश्रयाने भारतभर कीर्ती संपादन केली. त्यांनी अनेक नाटक कंपन्यांना व गुणी कलावंतांना आश्रय दिला. मल्लविद्येच्या प्रांतात त्यांनी संस्थानासह सर्व देशांतील मल्लांना उदार आश्रय दिला. रोमच्या आखाड्याच्या धर्तीवर कोल्हापुरात कुस्तीचे मैदान बांधले. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर ही मल्लविद्येची पंढरी बनली. दस्तूरखुद्द महाराज हे मल्लांचे मल्ल म्हणून प्रसिद्ध होते. पट्टीचा शिकारी म्हणून त्यांचा लौकिक होता. छ.शाहूंच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून कानपूर येथे कुर्मी क्षत्रिय सभेने सन १९१९ साली त्यांना राजर्षी पदवी बहाल केली. त्यांच्या कार्यामुळे दलित-पतितांचा उद्धारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. या राजाने अज्ञानी बहुजन समाजाला जागृत करण्याचे व्रत अखेरपर्यंत सांभाळले.

अखेरच्या दिवसांत द्वितीय चिरंजीव शिवाजी यांच्या अपघाती निधनाने सन १९१८मध्ये ते खचून गेले, तशातच मधुमेहाने ते ग्रासले होते. अखेर मुंबई येथे दि.६ मे १९२२ रोजी त्यांचे वयाच्या अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र राजाराम महाराज कोल्हापूरच्या गादीवर आले. !! छ.शाहू महाराज स्मृतिदिन निमित्त त्यांना व त्यांच्या लोककल्याणकारी कार्यांना मानाचा लवून मुजरा !

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**(भारताच्यावैभवशालीइतिहास-अस्मितेचेगाढेअभ्यासक.)**
**मु. रामनगर वॉर्ड नं.२०, गडचिरोली.**

# मतदानासाठी सूक्ष्म नियोजन

बीड दि. 4: मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाकडून अनेक प्रयत्न केले जात आहेत. यासाठी सूक्ष्म नियोजनही होत आहे. बीड लोकसभा मतदारसंघात चौथ्या टप्प्यात 13 मे रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. यासह 85 वर्षापेक्षा अधिक वृद्ध, दिव्यांग, निवडणूक कामासाठी इतर जिल्ह्यात कार्यरत, इतर जिल्ह्यातील चौथा टप्प्यातील मतदार बीड जिल्ह्यात कार्यरत, 13 मे रोजी विविध विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्राच्या ठिकाणी कर्तव्य पालन करत असणारे मतदार, निवडणुकीच्या काळात विविध कामांवर कार्यरत मतदारांनी मतदान करावे यासाठी आयोगाने वेगवेगळ्या उपाययोजना योजिल्या आहेत. मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी वेगवेगळे उपाययोजना केले जात आहेत. त्यातच गृह मतदान हा एक विशेष उपक्रम निवडणूक आयोगाद्वारे राबविला जात आहे. बीड लोकसभा मतदारसंघात 39 हजार 205 इतके मतदार 85 वर्षाच्या अधिकच्या वयोगटातील आहेत. यापैकी 340 आणि एकूण दिव्यांग 8562 पैकी 53 दिव्यांग मतदारांनी गृह मतदानासाठी अर्ज दाखल केला होता. असे एकूण 393 मतदार गृह मतदानाचा लाभ घेणार होते. आता 391 वृद्ध आणि दिव्यांग गृह मतदानाचा लाभ घेणार आहेत.

मतदानाच्या कामी कार्यरत असणारे बीडचे निवासी जे इतर ठिकाणी कार्यरत आहेत, तिथे मतदान ते करू शकतात. यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनात इतर दहा जिल्ह्यात बीड मधील निवडणुकीच्या कामावर असणाऱ्या मतदारांना मतपत्रिका त्यांच्या विधानसभा निहाय ठिकाणी पाठविण्यात आलेल्या आहेत. त्या जिल्ह्यातील सुविधा केंद्रात ते निश्चित दिवशी मतदान करून पुन्हा उलट टपाली त्या मतपत्रिका बीड जिल्ह्यात येतील. असे एकूण 1034 मतदार मतदान करणार आहेत. बीड लोकसभा मतदारसंघात इतर जिल्ह्यातील कार्यरत कर्मचारी ज्यांचे मतदान चौथा टप्प्यातच आहे त्यांच्या मतपत्रिका त्या त्या जिल्ह्यातून येणार असून येथे सुविधा केंद्रात ते मतदान करतील असे एकूण 365 मतदार बीड जिल्ह्यात निवडणुकीच्या कामावर आहेत. मतदान झाल्यावर त्या मतपत्रिका संबंधित जिल्ह्यात पाठवण्यात येणार आहेत.

बीड जिल्ह्यातीलच रहिवासी जे मतदान पथकाच्या विविध कामात गुंतलेले आहेत. जसे पोलीस,




होमगार्ड , व्हिडिओ ग्राफर , वाहन चालक असे एकूण 1800 मतदार त्यांच्या मतदानाचा हक्क यावेळी बीड लोकसभा मतदारसंघातील दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षणाच्या ठिकाणी सुविधा केंद्र उभारले असून येथे ते मतदानाचा हक्क बजावू शकतील. असे प्रशिक्षण 4, 5 मे तथा 11 मे ला होणार आहे. 10, 11 व 12 मे रोजी जिल्हास्तरीय पोस्टल बॅलेट द्वारा 600 मतदार मतदान करणार आहेत. यासह मतदान केंद्रावर 13 मे रोजी कार्यरत असणारे केंद्राध्यक्ष, मतदार अधिकारी व अन्य कर्मचारी जे निवडणुकीच्या कामावर 13 मे रोजी आहेत. ते ज्या मतदान केंद्रावर कार्यरत असणार आहेत तिथेच करतील. असे एकूण 8215 कर्मचारी हे त्यांच्या मतांचा हक्क 13 मे रोजी बजावतील.

# अखेर तो.. अपघात नसून खूनच

(केज प्रतिनिधी) बहुचर्चित असलेले मयत दत्तात्रय संदिपान केदार (वय 35 वर्षे रा. गप्पेवाडी ता. केज ) यांचा दि. 27 मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास विडा - पिंपळगाव शिवारात संगणमत करून खून केला होता. सदर मयताची ओळख पटू नये म्हणून त्याच्या डोक्याचा चंदामेंदा करण्यात आला होता. व पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. यामुळे त्याच्या कुटुंबासह नातेवाईकांना प्रेत ओळखण्यास अडचण येत होती पण शेवटी काही जन्म खुनाच्या आधारे ओळख पटविण्यास मदत झाली. दि. 30 मार्च रोजी मयताची पत्नी सखुबाई दत्तात्रय केदार यांनी एफ आय आर दाखल करून केज पोलीस स्टेशन येथे भा दं वि 302 व 34 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र आरोपी फरार झाले होते. हे मोठे आव्हान केज पोलिसासमोर होते. घटनास्थळी कोणताही पुरावा न ठेवता अपघात झाल्याचे भासवून खून झाला केला होता . यातील आरोपी विरुद्ध पुराव्याची साखळी निर्माण करण्याकरिता पोलीसांची प्रयत्नांची पराकाष्ठा पणाला लागली होती.हे एक आव्हान केज पोलिसांसमोर निर्माण झाले होते. याकरिता केज पोलिसांनी दोन विशेष पथके स्थापन करून आजूबाजूच्या परिसरातील हॉटेल्स, लॉजेस, दारूची दुकाने, गॅरेज व गोपनीय साक्षीदाराच्या आधारे आणि तांत्रिक पद्धतीने शोध घेऊन मुख्य आरोपी विलास उत्तम केदार त्याचा साथीदार परमेश्वर धोंडीबा चौरे व विकास मधुकर केदार यांना धाराशिव जिल्ह्यातून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. त्यामध्ये अनैतिक संबंधातून हा खून झाल्याचे निष्पन्न झाले आहे. यामध्ये आरोपींनी मागे कोणताही पुरावा न ठेवता अपघात झाल्याचे थंड डोक्याने खून केल्याचे उघड झाले आहे. या गुन्ह्यांमध्ये आरोपींनी गुन्ह्यात वापरलेला ट्रक ताब्यात घेतला असून पोलिसांनी आरोपींना कोर्टात हजर केले असता मा. न्यायालयाने त्यांचे दि. ०७ मे पर्यंत पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे. यामध्ये प्रकरणामध्ये पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर साहेब, अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधिक्षक उपविभाग कमलेश मीना साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोलीस हेड कॉन्स्टेबल राजू वंजारे, अनिल मंदे, पोलिस अंमलदार महादेव बहिरवाळ, संतोष गित्ते, प्रकाश मुंडे यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे.

## मोदींच्या काही गोष्टी आजही पटत नाही; राज ठाकरे



लोकसभेला कुणाला मुलाखती द्यायच्या नाहीत ठरवलं होतं. विधानसभेला मुलाखती देणार, त्यामुळे कोणी पत्रकार आले नाही. पाठिंबा दिल्यानंतरची पहिली जाहीरसभा. पाठिंबा का दिला, हे गुढीपाडव्याच्या सभेत सांगितलं होतं. मी सरळ चालणारा आहे. माता भगिनींनी कानात बोटं घालावीत. मध्ये मध्ये आमच्यातील ठाकरे... जनेटिकली प्रॉब्लेम आहे. बैल जसा मुततो तसा विचार नाही करत. एखादी गोष्ट पटली तर पटली. नाही पटली तर शेवटपर्यंत नाही पटणार. 2014 ते 2019 दरम्यान ज्या काही गोष्टी झाल्या. केंद्राने केल्या. त्या नाही पटल्या, मोदींच्या काही गोष्टी आजही पटत नाही. 2019 च्या सभेत जाहीर विरोध केल्याचं मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# निवडणूक निरीक्षक यांनी विधानसभा मतदारसंघातील स्ट्राँग रूमला दिल्या भेटी

बीड, दि. 4: निवडणूक निरीक्षक अजीमुल हक यांनी बीड लोकसभा मतदार संघाच्या अनुषंगाने आष्टी, गेवराई, बीड, माजलगाव या विधानसभा मतदारसंघातील स्ट्राँग रूमला भेट देऊन पाहणी केली. सोमवार दिनांक 13 मे रोजी बीड लोकसभा मतदारसंघात मतदान होणार असून त्या अनुषंगाने श्री हक यांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे झालेल्या तयारीची पाहणी केली.



# पाटोदा पोलीस स्टेशनची कोंबिंग ऑपरेशन दरम्यान दर्जेदार कारवाई

**पाटोदा (प्रतिनिधी)**

माननीय पोलीस अधीक्षक साहेब श्री नंदकुमार ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक ३०/४/२०२४ रोजी पहाटे ०५.०० ते ०८.०० चे दरम्यान गुन्हेगारांना आळा बसण्यासाठी कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले होते... सदर कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान श्री अनमोल केदार सपोनी पाटोदा यांना गोपनीय बातमीदार मार्फत बातमी मिळाल्या वरून स पो नि श्री केदार यांनी पोलीस स्टाफ सह सदर बातमीच्या ठिकाणी पंचासह ०७.३० वा चे सुमारास छापा मारला असता गावठी हातभट्टी तयार करण्यासाठी लागणारे साहित्याची जमवाजमव करून एक ईसम पोलीस व पंचास पाहून पळून जावू लागला असता त्यास पोलिसांनी जागीच पकडले नमुद ईसमास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव दादाराव भास्कर पवार वय ३५ वर्षे रा. वाघीरा ता. पाटोदा जि. बीड असे सांगितले. सदर ठिकाणी असणारे साहित्य कोणाचे आहे असे विचारले असता त्यांनी सदरचे साहित्य त्याचेच असल्याचे सांगितले. पोलिसांनी पंचासमक्ष सदर ठिकाणची पाहणी केली असता सदर ठिकाणी खालील वर्णनाचा व किंमतीचा प्रो. गुन्हयाचा माल मिळून आला.

1) हातभट्टीची तयार दारू करण्याची भट्टी चालू असून दोन लोखंडी बॅरल मध्ये अंदाजे ३६० लिटर रसायन

२) गावठी हातभट्टीची तयार दारू दोन ३५ लिटर क्षमतेचे प्लॉस्टीकच्या कॅन्डमध्ये अंदाजे ७० लिटर तयार दारू

३) सदर ठिकाणी गावठी हातभट्टीची दारू तयार करण्यासाठी सदर ठिकाणी भट्टी पेटविलेली असून भट्टीवर दोन लोखंडी बॅरल ठेवलेले असून त्यात गावठी हातभट्टी दारू तयार झाल्यानंतर काढून घेण्यासाठी एक लोखंडी टोपले व लोखंडी प्लेट गावठी हातभट्टीची तयार दारू जमीनीवर ओतून नाश करण्यात आले व प्लॉस्टीक व लोखंडी बॅरल लोखंडी पहार व दगडाने





तोडून जागीच वापरण्यास अयोग्य करण्यात आली व तसा पंचासमक्ष जागीच पंचनामा करण्यात आला. असा एकूण - ५०.५००/- रुपयाचे मुद्दमालावर पाटोदा पोलिसांनी कारवाई केली.. सदरची कारवाई दिनांक ३०/४/२०२४ रोजी ०७.३० वाजण्याचे सुमारास मौजे वाधीरा येथे ईसम नामे दादाराव भास्कर पवार वय ३५ वर्षे रा. वघिरा रा ता. पाटोदा जि. बीड हा विना परवाना बेकायदेशिर रित्या गावठी हातभट्टीची दारू तयार करण्यासाठी लागणारे लोखंडी व प्लॉस्टीकचे लहान मोठे बेरल, रसायन व गावठी हातभट्टी तयार दारू इत्यादी साहित्य किमत ५०,५००/- रू सह मिळून आला म्हणून त्याचे विरुध्द कलम 65 (क). (फ) (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम प्रमाणे पोलीस उपनिरीक्षक माधव काटकर यांनी फिर्याद दिली असून सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार सुनील जायभाय करीत आहेत.. सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, माननीय अप्पर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर, माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी अभिजीत धारांशिवकर, यांचे मार्गदर्शनाखाली स.पोलीस निरीक्षक श्री अनमोल केदार, पोलीस उपनिरीक्षक माधव काटकर, पोलीस अमलदार शुभम उगलमुगले, संजय पवार,रियाज पठाण यांनी केली..

सध्या लोकसभेची निवडणूक असल्याने पाटोदा पोलीस यांनी मा पोलीस अधीक्षक, मा अपर पोलीस अधीक्षक व मा उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शन खाली लोकसभा निवडणुक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस स्टेशन पाटोदा येथे दिनांक ३०/ ४/ २०२४ रोजी ११.००-१२.०० वाजण्याच्या दरम्यान रेल्वे पोलीस फोर्स च्या ५२ जवान हत्यारसह व २ पो उप निरी यांचेसह पोलीस स्टेशन पाटोदा कडील उपलब्द मनुष्यबळ सह सहा पोलीस निरीक्षक श्री अनमोल केदार यांनी पाटोदा शहरातून पथसंचलन करून पोलिसांनी शक्ती प्रदर्शन करीत रूटमार्च काढला. पोलीस स्टेशन पाटोदा हद्दीत आगामी लोकसभा निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी पाटोदा पोलिसांनी कंबर कसली आहे.

# मतदानामुळेच लोकशाही होणार सशक्त : जिल्हा निवडणूक अधिकारी



**बीड प्रतिनिधी**

बीड, 4: मतदानामुळेच लोकशाही सशक्त होणार. बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक 13 मे रोजी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी सर्व मतदारांनी मतदानात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले. बीड जिल्ह्याचे मतदान चौथ्या टप्प्यात सोमवार दिनांक 13 मे रोजी होणार असून जिल्ह्यात 21 लाखापेक्षा अधिक मतदार आहेत या सर्व मतदारांना आवाहन करून सांगितले, की मतदानाचा हक्क 13 मे रोजी बजावावा. निवडणुकीच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी निवडण्याचा लोकशाहीचा महोत्सव दर पाच वर्षांनी एकदाच येतो. यामध्ये आपले कर्तव्य प्रत्येक सुजाण मतदाराने निभावले पाहिजे. लक्षात असू द्या सोमवार दिनांक 13 मे चौथ्या टप्प्यात 13 मे ला निवडणुका होणार असून केवळ निवडणुकीचा हक्क बजावण्यासाठी शासनाने सुट्टी जाहीर केली आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाची संपूर्ण यंत्रणा बीडवासियांसाठी कार्यरत असून ही संपूर्ण यंत्रणा विशेष परिश्रम घेत आहे. बीडच्या मतदारांची यात मुख्य भूमिका आहे.

सहली/ तीर्थाटन करताना सोमवार दिनांक 13 मे तारीख लक्षात असू द्या. आपल्या तर्जनीला शाई लावण्याची ही संधी गमावू नका. तरी मतदानाचा दिवस हा महत्त्वाचा असून मतदान 13 मे ला करून लोकशाहीच्या महोत्सवात सहभागी होऊन मतदान करण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केले आहे.

# प्रथमस्तरीय संगणकीकृत पुरवणी सरमिसळ प्रक्रिया संपन्न

बीड ,दि. 4: प्रथमस्तरीय संगणकीकृत पुरवणी सरमिसळ प्रक्रिया आज जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे उपस्थित होते. यासह विविध राजकीय पक्षातील प्रतिनिधी यांच्यासमोर ही प्रक्रिया पार पाडण्यात आली. बीड लोकसभा मतदारसंघात 41 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यामुळे दोन बॅलेट युनिट



अधिक लागणार आहेत. हे अधिकचे बॅलेट युनिट अकोला वरून 2000 तर नांदेडहून 800 आलेले आहेत. या बॅलेट युनिट मशीनची प्रथमस्तरीय तपासणी (FLC) आयोगाच्या अभियंतामार्फत 2 मे पासून सुरू आहे. 10 एप्रिल रोजी प्रथम सरमिसळ प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे विधानसभा निहाय मतदान मशीन पोहोचविण्यात आलेले आहेत.

त्यातील उरलेले कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट, आणि व्हीव्हीपॅट तसेच आता नांदेड व अकोला वरून आलेले बॅलेट युनिटचे आज सरमिसळ करण्यात आले. 5857 बॅलेट युनिट, 493 कंट्रोल युनिट, आणि 510 व्हीव्हीपॅट येवढा मतदान यंत्राची आज सरमिसळ करण्यात आली.

उद्या सकाळी साडेसहा वाजता वखार महामंडळातील गोदामात सरमिसळ झालेल्या मतदान यंत्र विधानसभा निहाय ठेवण्यात येतील. यानंतर दुसरी सरमिसळ प्रक्रिया राजकीय प्रतिनिधीच्या समोर 6 तारखेला सकाळी 10 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे निवडणूक निरीक्षक अजीमुल हक यांच्या उपस्थित करण्यात येईल. या प्रक्रियेनंतर विधानसभेतील मतदान केंद्रात मतदान यंत्र नेण्यासाठी उपलब्ध असतील. 13 मे रोजी मतदान झाल्यानंतर विधानसभा निहाय मतदान केंद्रातील मतदान मशीन शासकीय तंत्रनिकेतन येथे विधानसभा निहाय ठेवण्यात येतील. यावेळी किती मशीन नादुरुस्त आहेत आणि त्या ऐवजी मतदान प्रक्रियेत वापरलेल्या मशीनीची माहिती राजकीय प्रतिनिधींना देण्यात येईल.

# मुलीचा वाढदिवस अनोख्या पध्दतीने साजरा

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर/विश्वास चोपडे**

राज्य परिवहन मंगळवेढा आगारातील चालक श्री.तानाजी इंगळे यांची मुलगी कु.स्वरा हिचा ४ मे २०२४रोजी वाढदिवासानिमित्त श्री.तानाजी इंगळे यांनी आपल्या मुलीचा वाढदिवस अनोख्या पध्दतीने साजरा केला. त्यांनी रा.प.मंगळवेढा आगारास शोभेच्या झाडासह पाच कुंड्या भेट दिल्या. यावेळी



आगार व्यवस्थापक श्री. संजय भोसले, चालक श्री. तानाजी इंगळे, स्थानक प्रमुख श्री.शरद वाघमारे, कार्यशाळा पर्यवेक्षक श्री. विठ्ठल भोसले, श्री.संतोष चव्हाण, श्री.अमोल काळे, श्री.अमोल शिनगारे आदी उपस्थित होते.

# भारतराव शिंदे यांचे निधन



बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील रहिवाशी तथा डॉ.प्रमोद शिंदे यांचे वडिल भारतराव साहेबराव शिंदे यांचे आज 73 व्या वर्षी दु:खद निधन झाले. त्यांच्यावर बीड शहरातील भगवानबाबा प्रतिष्ठान परिसरातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुन, जावई ,नातवंडे असा परिवार आहे. बीड शहरातील हाडाचे तज्ञ डॉक्टर प्रमोद शिंदे यांचे ते वडील होते.

# अध्यापन क्षेत्रातील ४० वर्षांच्या प्रदिर्घ सेवेनंतर मुहम्मद मुस्लीम कबीर सेवानिवृत्त शैक्षणिक,पत्रकारिता,साहित्यिक, सामाजिक क्षेत्रातील मित्रांकडून सन्मान

(लातूर प्रतिनिधी)

जिल्ह्यातील औसा तालुक्यात असलेल्या हज़रत सुरत शाह उर्दू शाळेचे शिक्षक मुहम्मद मुस्लीम कबीर यांनी अध्यापन क्षेत्रात ४० वर्षे कर्तव्य बजावले. नियत वयोमानानुसार ते दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले. यावेळी फ़खधरुद्दीन अली अहेमद एज्युकेशन सोसायटीचे अल्हाज शेख मुहम्मद उर्फ छोटे मियाँ, ॲड. समीउद्दीन पटेल, मुख्याध्यापक मुहम्मद शफीउद्दीन पटेल, झाकीर जरगर, डॉ. वहीद कुरेशी यांनी मुहम्मद मुस्लीम कबीर यांच्या शैक्षणिक, पत्रकारितेतील आणि सामाजिक योगदनाबद्दल मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन शेख मुजीब शब्बीर आणि आभार बदीउद्दीन पटेल यांनी मानले. शाळेतर्फे कबीर सरांना भेट वस्तू मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यावेळी मुहम्मद अब्दुल गनी सर, कु.रजिया बाजी, कु.शेख एम.एम. बाजी, शबाना मुंगले बाजी, शगुफ़्ता मन्यार बाजी, यासिर अराफत काझी, नजीबुद्दीन पटेल, जिलानी काझी व इतर मित्र उपस्थित होते. ऑर्बिट इंग्लिश स्कूलचे सचिव ॲड. इक्बाल शेख, अझीम ज्युनिअर कॉलेजचे पर्यवेक्षक डॉ. खलील सिद्दीकी, सोलापूरचे सुप्रसिद्ध पत्रकार अय्युब नल्लामंदु, उस्मानाबादच्या शिक्षक संघाचे खिजर मोरवे, लातूरचे सुप्रसिद्ध पत्रकार शेख अब्दुस् समद, जिलानी मुल्ला राज, उर्दू शिक्षक मुहम्मद शरीफ हन्नुरे आणि संस्थेच्या इतर मित्रांनी लेखांच्या माध्यमातून मुहम्मद मुस्लीम कबीर यांच्या शैक्षणिक, सामाजिक, पत्रकारितेतील आणि साहित्यिक सेवा यापुढेही सुरू ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. यावेळी हिंदी साप्ताहिक लातूर रिपोर्टरचे संपादक मज़हर पटेल आणि कार्यकारी संपादक ॲड. इक्बाल शेख यांनी सांगितले



की, मुस्लीम कबीर यांचे सार्वजनिक जीवन आणि सेवा यावर आधारित विशेषांक लवकरच प्रकाशित करण्यात असल्याचे म्हटले.

# खडसे दरवाजा ठोकून ठोकून थकले, साहेब, त्यांची पक्षातून हकालपट्टी करा

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाची आज जळगावच्या भुसावळ येथे पार पडली. या सभेला पक्षाचे प्रमुख शरद पवार स्वत: उपस्थित होते. या सभेत माजी आमदार संतोष चौधरी यांनी एकनाथ खडसे यांची हकालपट्टी करून टाका, अशी मागणी शरद पवार यांच्यासमोर केली. “खडसे दरवाजा ठोकून ठोकून थकले. मात्र भाजप त्यांना घेत नाही. साहेब, आपली आमदारकी वाया गेली. यांची दिल्लीला जायला तब्येत खराब नसते आणि मीटिंग घ्यायला तब्येत खराब असते. सुनेला तिकीट मिळाल्यानंतर कशी तब्येत खराब होत नाही?” अशी टीका संतोष चौधरी यांनी केली आहे. “ते ज्या ज्या ठिकाणी फिरताहेत त्या ठिकाणी त्यांच्या सोबत



100 लोक सुद्धा फिरत नाही. एकनाथ खडसे यांना भाजपने व्यासपीठावर यायला सांगितले आहे. फक्त चोरून चोरून सभा घ्यायला सांगितलं आहे. एकनाथ खडसे यांचा विषय संपवून टाका. स्वतः आमदारकीचा राजीनामा द्यायला तयार नाहीत. माझ्यासारखा स्वाभिमानी कार्यकर्ता असला तर आमदारकीचा राजीनामा देऊन टाकला असता. मात्र थोडीफार पण लाज वाटत नाही”, असा घणाघात संतोष चौधरी यांनी केला.‘साहेब, यापुढे तुम्ही सावध राहा’ “अशा लोकांपासून साहेब, यापुढे तुम्ही सावध राहा. ज्या लोकांनी तुमच्यासोबत गद्दारी केली आहे त्या लोकांचा बदला आम्ही घेतल्याशिवाय स्वस्त बसणार नाहीत”, अशा शब्दांत माजी आमदार संतोष चौधरी यांनी शरद पवार यांच्यासमोर भाषणातून एकनाथ खडसे यांच्यावर हल्लाबोल केला.

## एकनाथ खडसे भाजपात जाणार

एकनाथ खडसे हे पुन्हा भाजपात जाणार आहेत. स्वत: एकनाथ खडसे यांनी याबाबतचं वृत्त दिलं आहे. पण तरीही एकनाथ खडसे यांचा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम रखडला आहे. एकनाथ खडसे यांच्या पक्षप्रवेशाकडे राज्याचं लक्ष आहे. दुसरीकडे भाजप नेते गिरीश महाजन हे अजूनही खडसेंवर निशाणा साधत आहेत. एकनाथ खडसे भाजपात असताना, गिरीश महाजन आणि खडसे यांच्यात शीतयुद्ध रंगलेलं असायचं. नंतर खडसेंनी राष्ट्रवादीत प्रवेश केल्यावर दोन्ही नेते एकमेकांवर उघडपणे टीका करु लागले होते. दोन्ही नेत्यांमधील हा संघर्ष अजूनही सुरुच आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )